मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 31 मे 2026 | पान- 1


# ताथवडे, पुनावळे, वाकड सेवा रस्त्यांचे काम प्राधान्याने मार्गी लागणार : आमदार शंकर जगताप

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या बैठकीत सेवा रस्त्यांच्या अंतिम टप्प्यातील कामाला गती देण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

ताथवडे, पुनावळे आणि वाकड या परिसरातील तीन महत्त्वाच्या सेवा रस्त्यांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे सक्त आदेश केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी दिले. याचबरोबर, ताथवडे आणि पुनावळे येथील अंडरपासमधील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेऊन हे अंडरपास रुंद करण्याच्या सूचनाही त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. या भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकार सकारात्मक असून अधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश गडकरी यांनी दिल्याची माहिती चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी दिली.

राष्ट्रीय महामार्गांवरील प्रलंबित कामांविषयी शनिवारी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पुण्यामध्ये बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत उपस्थित रहात आमदार शंकर जगताप यांनी



राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरील (पुणे पश्चिम बायपास) वाहतूक कोंडी आणि पायाभूत सुविधांकडे आमदारांनी लक्ष वेधले.

आमदार शंकर जगताप याबाबत म्हणाले सयाजी अंडरपास, भुमकर चौक, ताथवडे अंडरपास, पुनावळे अंडरपास, पवना नदी क्रॉसिंग, किवळे जंक्शन आणि मामुर्डी अंडरपास या परिसरांमध्ये सध्याच्या भुयारी



### अतिरिक्त बॉक्स स्ट्रक्चर्सला "ग्रीन सिग्नल"

» कपुनावळे, वाकड, किवळे आणि रावेत या प्रमुख जंक्शन्सवरून रोज लाखो वाहनांची आणि जड मालवाहतुकीची ये-जा सुरू असते. वाहतुकीचा ताण लक्षात घेता या ठिकाणी अतिरिक्त बॉक्स स्ट्रक्चर्स आणि नवीन अंडरपास बांधण्याबाबत देखील केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून हिरवा कंदील मिळाला आहे.

"ताथवडे, पुनावळे आणि वाकड परिसरातील अंतर्गत वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी सेवा रस्ते आणि अंडरपासचे रुंदीकरण अत्यंत आवश्यक आहे. या अत्यंत महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी अधिकाऱ्यांना तातडीने काम सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे या भागातील नागरिकांना आणि आयटी क्षेत्रातील नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल."

- शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा

मार्गांची क्षमता अतिशय कमी आहे. परिणामी, सेवा रस्त्यांचे काम तातडीने पूर्णत्वाला नेणे गरजेचे आहे. हीच मागणी गडकरी साहेबांकडे मांडली आहे. सेवा रस्त्यांची गरज आणि नागरिकांच्या मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने या रस्त्यांचे काम पूर्ण करण्याचे सक्त निर्देश गडकरी यांनी दिले आहेत.

# जनगणना प्रक्रियेस नागरिकांचे सहकार्य आवश्यक : आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

## स्व-गणना केलेल्यांनी SE ID उपलब्ध करून द्यावा; घरसूचीकरण व घरगणना प्रक्रिया 14 जूनपर्यंत सुरु

**पिंपरी | प्रतिनिधी**

'जनगणना २०२७' अंतर्गत सुरू असलेली 'घरसूचीकरण व घरगणना' प्रक्रिया वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण होण्यासाठी नागरिकांनी प्रगणकांना आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

महापालिका क्षेत्रात १६ मेपासून प्रगणकांमार्फत घरसूचीकरण आणि घरगणना प्रक्रिया सुरू असून, स्व-गणना माध्यमातून




नागरिकांनी भरलेल्या माहितीची पडताळणी आणि अंतिम नोंदणी सध्या केली जात आहे. १ ते १५ मे २०२६ या कालावधीत स्व-गणना पूर्ण केलेल्या नागरिकांनी त्यांना प्राप्त झालेला स्व-गणना ओळख क्रमांक (SE ID) प्रगणकांना उपलब्ध करून द्यावा, असे डॉ. सूर्यवंशी म्हणाले.

स्व-गणना ओळखक्रमांक उपलब्ध झाल्यानंतरच संबंधित घराची जनगणना प्रक्रिया अंतिम स्वरूपात पूर्ण होऊ शकते. ज्या नागरिकांनी अद्याप स्व-गणना केलेली नाही, त्यांची माहिती प्रगणकांकडून प्रत्यक्ष भेटीद्वारे नोंदविण्यात येत असून ही प्रक्रिया १४ जून २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे.

जनगणना कायदा, १९४८ अंतर्गत राबविण्यात येणारी जनगणना ही राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाची प्रक्रिया असून, विकास नियोजनासाठी अचूक आणि विश्वासार्ह माहिती संकलनाचा हा आधार मानला जातो. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि नागरी सेवांच्या प्रभावी नियोजनासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे पिंपरी चिंचवड महापालिकेचे उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले.

# फुगेवाडी विषारी दारूकांडातील मृतांच्या कुटुंबीयांना 5 लाख मदत

## मंत्री गिरीश महाजन यांची घोषणा; दोषींवर कठोर कारवाईचा इशारा त्यांनी दिला

**पिंपरी | प्रतिनिधी**

फुगेवाडी येथील विषारी दारू पिऊन मृत झालेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाखांची मदत केली जाणार आहे, असे राज्याचे आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन यांनी शनिवारी (दि. 30) सांगितले. या प्रकरणात अतिउच्च अधिकारी दोषी असल्यास त्यांनाही सोडले जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

मंत्री गिरीश महाजन यांनी आज फुगेवाडी भागास भेट दिली. मृतांच्या कुटुंबीय, नातेवाईकांनाची भेट घेऊन त्यांचे सात्वंन केले. त्यांना धीर दिला. या वेळी आमदार शंकर जगताप, आमदार अमित गोरखे, महापौर रवी लांडगे, सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, माजी खासदार अमर साबळे आदी उपस्थित होते.



### दोषींना कोणतीही माफी नाही

**» या प्रकरणात राज्य उत्पादन शुल्क विभागाने १३ अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. दारू विक्रीकडे दुर्लक्ष करणाऱ्या पोलिस आणि संबंधित यंत्रणांवरही कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. दोषी कितीही वरिष्ठ असले तरी त्यांना सोडले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा मंत्री गिरीश महाजन यांनी दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही संबंधित यंत्रणांना कठोर कारवाईचे आदेश दिले असून या प्रकरणातील एकही दोषी**

माध्यमाशी बोलताना मंत्री महाजन म्हणाले, मिथेनॉलचे मिश्रण करून विषारी दारूची विक्री केली जात होती. ती दारू पिल्याने 19 जणांचा मृत्यू झाला आहे. मृत्यू झालेल्या कुटुंबातील व्यक्तीच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाखांची मदत केली जाणार आहे.

रोजीरोटीसाठी त्यांना पिंपरी-चिंचवड महापालिकेत कंत्राटी पद्धतीने सामावून घेतले जाणार आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने 13 जणांना निलंबित केले आहे. दारू विक्रीकडे पोलिसांचे दुर्लक्ष झाले आहे.

रोजीरोटीसाठी त्यांना पिंपरी-चिंचवड महापालिकेत कंत्राटी पद्धतीने सामावून घेतले जाणार आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने 13 जणांना निलंबित केले आहे. दारू विक्रीकडे पोलिसांचे दुर्लक्ष झाले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांना कडक शब्दात सूचना दिल्या आहेत. यापुढे एक थेंबही दारूची विक्री होणार नाही. यातील एकही दोषी सुटणार नाही, असे महाजन यांनी सांगितले.

### मदत आणि रोजगाराची घोषणा

**» फुगेवाडी येथील विषारी दारू प्रकरणात मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत दिली जाणार आहे. तसेच संबंधित कुटुंबातील सदस्यांना उपजीविकेसाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेत कंत्राटी पद्धतीने सामावून घेण्याची घोषणाही राज्याचे आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन यांनी केली. मृतांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांनी सांत्वन करत शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचा विश्वास दिला.**

### १९ मृत्यूंनी राज्य हादरले

**» मिथेनॉल मिश्रित विषारी दारूचे सेवन केल्याने या प्रकरणात आतापर्यंत १९ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेने संपूर्ण राज्य हादरले असून अवैध दारू विक्रीच्या गंभीर प्रश्नावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. प्रशासनाने तातडीने तपास सुरू केला असून संबंधित परिसरात विशेष कारवाई मोहीम राबविण्यात येत आहे. या दुर्घटनेत अनेक कुटुंबांचे आधारस्तंभ हिरावले गेल्याने हळहळ व्यक्त होत आहे.**

# पिंपरी-चिंचवड महापालिकेतील 88 अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त; आयुक्तांच्या हस्ते सत्कार

## आचार्य अत्रे रंगमंदिरात गौरव सोहळा; विविध विभागांतील कर्मचाऱ्यांना स्मृतिचिन्ह देऊन निरोप

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या विविध विभागांचे एकूण 88 अधिकारी व कर्मचारी रविवारी (दि. 31) सेवानिवृत्त होत आहेत. त्यानिमित्त आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते त्यांचा स्मृतिचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला.

संत तुकारामनगर, पिंपरी येथील आचार्य अत्रे रंगमंदिर येथे झालेल्या कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, किरण गायकवाड, प्रफुल्ल पुराणिक, पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष बबन झिंजर्डे, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



सेवानिवृत्त होणाऱ्यांमध्ये सहशहर अभियंता माणिक चव्हाण, कार्यकारी अभियंता रवींद्र सूर्यवंशी, सहाय्यक आयुक्त राजीव घुले, राजाराम सरगर, मुख्याध्यापक बुधा नाडेकर, रामदास चपटे, बाळासाहेब आल्हाट, मुख्याध्यापिका पुष्पलता महाकाळ, अंजली झगडे, श्रीकांत चौगुले, सविता म्हस्के, सुनंदा शिंदे, भारती वर्णे, संगीता वाघमारे, प्रशासन अधिकारी ग्यानचंद भाट, सुचेता कुलकर्णी, कार्यालय अधीक्षक महादेव बोरे, क्रीडा पर्यवेक्षक गोरक्ष तिकोने, रंगराव कारंडे यांचा समावेश आहे.

तसेच, क्रीडा शिक्षक मंगल जाधव, स्टाफ नर्स उज्ज्वला जाधव, विद्युत पर्यवेक्षक अनिल नायर, फार्मासिस्ट शशिकांत रिटे, मुख्य लिपिक राजू वेताळ, उपशिक्षक संध्या गायकवाड, मिनाक्षी लोखंडे, केमिस्ट उमा भोगे, भांडारपाल प्रशांत आल्हाट, केशव घाटगे, भगवान शिंगाडे, धनाजी माळवदकर, अंकुश माळी, धनाजी गावडे, हेमंत ढवळे, अनिल मोरे, आबा पाटील, हमीदसाहेब पटेल, गोरक्ष आगळे, शांताराम घारे, हनुमंत घाडगे, दत्तात्रय तापकीर, मोहनदास सर्वगोड, विठ्ठल निगडे, दिलीप गायकवाड, लक्ष्मण तिटकारे, शशिकांत शिंदे यांचा समावेश आहे. तसेच, संजीवनी पवार, नंदकुमार वाघेरे, बाळासाहेब इंगळे, नितीन काळभोर, एकनाथ वांभिरे, सावकार भिवरे, चंद्रकांत मिरजकर, राजाराम लोंढे, बाबूराव चिंचवडे, बाळू साठे, रविंद्र कुदळे, नारायण केसवड, रमेश दोरगे, रमेश देवकाते, राजू आल्हाट, छाया थोरात, शशीकला पाटील, माणिक कांबळे, मुकुंद कोंढरे, मालन ओव्हाळ, सुधीर जगताप, धनंजय ओव्हाळ, देवराम पवार, विश्वनाथ बोऱ्हाडे, दिलीप हनमंते व विजय जगताप हे निवृत्त झाले.

### यांनी घेतली स्वेच्छानिवृत्ती

**» स्टाफ नर्स मीरा शिंदे, मुकादम विजय माछरे, सफाई कर्मचारी प्रमिला जाधव, आशा लादे, रोशन मुजावर, सुमन ओव्हाळ, राजू लोंढे, बाजीराव कुटे, मालती वाघेरे, वैजयंती देवकर, लतिका बुट्टे, मनोहर शितोळे महादेव तेलंगी व विजयमाला कांबळे यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली. सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर प्रास्ताविक तानाजी नरळे यांनी केले.**

# पुणे पालिकेची केंद्रीय निवडणूक आयोगाकडे धाव!

## कनिष्ठ अभियंता पदाच्या 169 जागांच्या भरतीचा निकाल आचारसंहितेच्या कचाट्यात; स्थानिक निवडणूक विभागाच्या ढोबळ उत्तरामुळे पेच वाढला.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेतील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदाच्या १६९ जागांच्या भरती परीक्षेचा निकाल आदर्श आचारसंहितेत अडकल्याने उमेदवारांचा संयम सुटू लागल्याने वारंवार महापालिकेकडे निकालाबाबत विचारणा केली आत आहे. त्यातच, निकाल जाहीर करण्याबाबत महापालिकेस स्थानिक निवडणूक विभागाकडून स्पष्ट शब्दांत कळविले जात नसल्याने आता महापालिका प्रशासनाने थेट केंद्रीय निवडणूक आयोगास पत्र पाठविण्याचा निर्णय घेतला आहे.

कनिष्ठ अभियंता पदाच्या १६९ जागांसाठी तब्बल ४१ हजार अर्ज प्राप्त झाले होते. प्रत्यक्ष परीक्षेला सुमारे ५० टक्के उमेदवार उपस्थित राहिले. परीक्षा होऊन महिना उलटूनही निकाल जाहीर न झाल्याने उमेदवारांमध्ये संतापाचे वातावरण असून, आम्ही परीक्षा दिली आहे, त्यामुळे किमान निकाल तरी जाहीर करा, अशी मागणी उमेदवारांकडून होत आहे.




### रिक्त पदांमुळे विकासकामांवर परिणाम

**» महापालिकेतील अभियंत्यांची अनेक पदे रिक्त असल्याने रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज आणि इतर पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या कामकाजावर परिणाम होत आहे. त्यामुळे रखडलेली भरती प्रक्रिया लवकर पूर्ण होणे प्रशासनासाठीही महत्त्वाचे ठरत आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर नियुक्ती प्रक्रिया वेगाने पूर्ण करून रिक्त पदे भरण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.**

दरम्यान, महापालिकेत अभियंत्यांची अनेक पदे रिक्त असल्याने रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज आणि अन्य पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या कामकाजावर परिणाम होत आहे. त्यामुळे रखडलेली भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची मागणी प्रशासनातील अधिकाऱ्यांकडूनही होत आहे.

निवडणूक आयोगाच्या नियमावलीनुसार आचारसंहिता काळात अशा विषयांवर जिल्हाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घेता येते. त्यानुसार महापालिकेने जिल्हाधिकारी कार्यालयालाही पत्र पाठविले आहे. तसेच, निवडणूक विभागाकडे मार्गदर्शन मागविण्यात आले होते. मात्र, निवडणूक विभागाने आदेशानुसार कार्यवाही करा, अशा अवघ्या तीन शब्दात ढोबळ आणि संदिग्ध उत्तर मिळाल्याने निकाल जाहीर करावा की थांबवावा, याबाबत प्रशासनासमोर पेच निर्माण झाला आहे. त्यामुळे आता पालिकेने केंद्रीय निवडणूक आयोगाकडेच धाव घेतली आहे.

महापालिकेतील अभियंत्यांची अनेक पदे रिक्त असल्याने रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज आणि इतर पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या कामकाजावर परिणाम होत आहे. त्यामुळे रखडलेली भरती प्रक्रिया लवकर पूर्ण होणे प्रशासनासाठीही महत्त्वाचे ठरत आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर नियुक्ती प्रक्रिया वेगाने पूर्ण करून रिक्त पदे भरण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### निकालाची उत्सुकता शिगेला

**» कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदाच्या १६९ जागांसाठी तब्बल ४१ हजार अर्ज प्राप्त झाले होते. परीक्षेला सुमारे ५० टक्के उमेदवार उपस्थित राहिले. परीक्षा होऊन महिना उलटला तरी निकाल जाहीर न झाल्याने उमेदवारांमध्ये नाराजी वाढत आहे. निकालाबाबत महापालिकेकडे सातत्याने विचारणा केली जात असून, किमान निकाल जाहीर करून अनिश्चितता दूर करावी, अशी मागणी उमेदवारांकडून होत आहे.**

### आचारसंहितेमुळे प्रशासनासमोर पेच

**» निकाल जाहीर करण्यासंदर्भात महापालिकेने निवडणूक विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मार्गदर्शन मागितले होते. मात्र, निवडणूक विभागाकडून 'आदेशानुसार कार्यवाही करा' असे संदिग्ध उत्तर मिळाल्याने प्रशासनासमोर संभ्रम निर्माण झाला आहे. निकाल जाहीर करावा की थांबवावा, याबाबत स्पष्टता नसल्याने महापालिकेने आता थेट केंद्रीय निवडणूक आयोगाकडे मार्गदर्शन मागण्याचा निर्णय घेतला आहे.**

# विषारी दारू प्रकरणाच्या तपासासाठी 'सीआयडी'चे पाच पथके

## सीआयडी'कडून या प्रकणाचा सखोल तपास करण्यासाठी पाच पथके तयार करण्यात आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

विषारी दारू प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीआयडी) सोपविण्यात आला. 'सीआयडी'कडून या प्रकणाचा सखोल तपास करण्यासाठी पाच पथके तयार करण्यात आली आहे.

विषारी दारू प्याल्याने पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहर परिसरातील १९ जणांचा मृत्यू झाला. ही घटना उघडकीस आल्यानंतर उत्पादन शुल्क विभाग, पुणे, पिंपरी-चिंचवड पोलिसांनी तपास सुरू केला. वेगवेगळ्या भागात छापे टाकून चार हजार लिटर गावठी दारू, तसेच चार हजार लिटर असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणात मुख्य सूत्रधार योगेश वानखेडे याच्यासह दहा जणांना अटक करण्यात आली. या प्रकरणाचा तपास शुक्रवारी (२९ मे) रात्री उशीरा 'सीआयडी' सोपविण्यात आला.

या प्रकरणाचा तपास करण्यासाठी 'सीआयडी'ने पाच पथके तयार केली असून, तपासाची धुरा वरिष्ठ महिला पोलीस अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आली आहे. तपासाच्या अनुषंगाने पुणे, पिंपरी पोलीस, तसेच उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांकडून शनिवारी माहिती घेण्यात आली', अशी माहिती 'सीआयडी'च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.



विषारी दारू प्रकरणात दापोडी आणि हडपसर पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. 'सीआयडी'च्या पथकाने पिंपरीतील फुगेवाडी, दापोडी, तसेच शिवाजीनगरमधील वडारवाडी, हडपसमधील पांढरे मळा परिसरातील गावठी दारू अड्डयांना भेट दिली. या भागातील नागरिकांकडून माहिती घेण्यात आली. 'सीआयडी'चे अतिरिक्त पोलीस महासंचालक सुनील रामानंद यांच्या मार्गदर्शनाखाली पाच पथके तपास करत आहेत.

### आग लावून गावठी दारूची तपासणी

**» वानखेडे याने २२ मे रोजी ऊरळी कांचनमधील गावठी दारू तयार करणारा राजू प्रजापती याच्याकडून पाच कॅन खरेदी केले. या प्लास्टिक कॅनमध्ये त्याने पाणी मिसळले. दहा कॅन घेऊन तो खडकीतील गोदामात गेला. तेथे ठेवलेले 'मिथेनॉल' त्याने गावठी दारूत मिसळले. त्यानंतर गावठी दारू कडक झाली अहो का हे तपासण्यासाठी काडीपेटीने तपासणी केली. जळती काडी टाकल्यानंतर मिथेनॉल मिश्रीत गावठी दारूने पेट घेतला. त्यानंतर पहाटे दारूचे कॅन घेऊन फुगेवाडीतील कर्नलसिंह विरका, दापोडीतील इरफान उर्फ पप्पू कुरेशी, हडपसरमधील आकाश जाधव, वडारवाडीतील आर्यन धोत्रे याच्या दारू अड्डयावर दिले, अशी माहिती तपासात मिळाली आहे. विषारी दारू प्रकरण उघडकीस आल्यानंतर वानखेडेने ९० लिटर मिथेनॉल ओतून दिले.**

# 15 जूनपासून श्री क्षेत्र भीमाशंकर दर्शनाला सुरुवात

## ऑनलाइन नोंदणी केलेल्या भाविकांनाच मिळणार प्रवेश, काही कामे अपूर्ण असल्याने मुहूर्त पुढे ढकलण्यात आला.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील सह्याद्रीच्या कुशीत वसलेले आणि बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक मानले जाणारे श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर तब्बल पाच महिन्यांनंतर पुन्हा भाविकांसाठी खुले होणार आहे. मंदिरातील सुरू असलेल्या पुनर्बांधणी आणि विकासकामांमुळे गेल्या काही महिन्यांपासून दर्शन व्यवस्था बंद होती. आता सर्व प्रमुख कामे अंतिम टप्प्यात पोहोचल्याने 15 जूनपासून भाविकांना मंदिरात प्रवेश देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

मंदिर दर्शनासाठी 9 जानेवारीपासून बंद ठेवण्यात आले होते. मुख्य मंदिराच्या सभामंडपाचे पुनर्बांधणीचे काम, परिसरातील विकासकामे आणि भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने हा निर्णय घेतला होता. त्यामुळे राज्यभरातील तसेच देशभरातील लाखो शिवभक्तांना भीमाशंकर दर्शनासाठी प्रतीक्षा करावी लागत होती. सुरुवातीला 31 मे रोजी मंदिर खुले करण्याचा विचार होता, मात्र काही कामे अपूर्ण असल्याने हा मुहूर्त पुढे ढकलण्यात आला. आता 15 जून ही नवीन तारीख निश्चित करण्यात आली आहे.



### २८८ कोटींच्या विकासकामांना वेग

» सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर परिसरात सुमारे २८८ कोटी रुपयांच्या विकासकामांची अंमलबजावणी सुरू आहे. यामध्ये मंदिर परिसरातील पायाभूत सुविधा, रस्ते, पायरी मार्ग, स्वच्छता व्यवस्था, सुरक्षा यंत्रणा आणि भाविकांसाठी विविध सुविधा उभारल्या जात आहेत. मुख्य सभामंडपाचे दगडी बांधकाम हे या प्रकल्पाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. पारंपरिक वास्तुकलेचा वारसा जपत मंदिर परिसर अधिक भव्य आणि आकर्षक करण्यावर भर दिला जात आहे. यामुळे भविष्यात भाविकांना अधिक दर्जेदार सुविधा मिळणार आहेत.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू आहेत. मंदिर आणि परिसराच्या सुशोभीकरणासाठी तसेच भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सुमारे 288 कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांची अंमलबजावणी सुरू आहे. यामध्ये मंदिर परिसरातील पायाभूत सुविधा, रस्ते, पायरी मार्ग, सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता आणि भाविकांसाठी आवश्यक सोयीसुविधांचा समावेश आहे.

मुख्य सभामंडपाची पुनर्बांधणी हे या प्रकल्पातील सर्वात महत्त्वाचे काम मानले जात आहे. जुन्या सभामंडपाचा संपूर्ण भाग काढून त्याऐवजी दगडी बांधकामात नवीन सभामंडप उभारण्यात येत आहे. हे बांधकाम पारंपरिक वास्तुशैली जपत करण्यात येत असल्याने त्यासाठी अधिक वेळ लागत आहे. प्रशासनाच्या माहितीनुसार सभामंडपाच्या डोमचे काम जवळपास पूर्ण झाले असून मंदिराकडे जाणाऱ्या पायरी मार्गाचे सुमारे 90 ते 95 टक्के काम पूर्ण झाले आहे.

### ऑनलाइन नोंदणीशिवाय प्रवेश नाही

» मंदिर सुरू झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने विशेष नियम लागू केले आहेत. दर्शनासाठी ऑनलाइन नोंदणी अनिवार्य करण्यात आली असून ५ जूनपासून नोंदणी प्रक्रिया सुरू होणार आहे. अधिकृत संकेतस्थळावरून आगाऊ नोंदणी करूनच मंदिरात प्रवेश मिळणार आहे. गर्दीचे व्यवस्थापन आणि सुरक्षेच्या दृष्टीने दररोज केवळ १ हजार भाविकांना दर्शनाची परवानगी दिली जाणार आहे. नोंदणी केलेल्या प्रत्येक भाविकाने वैध ओळखपत्र सोबत बाळगणे बंधनकारक असणार आहे.

### पाच महिन्यांनंतर खुले होणार मंदिर

» श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर ९ जानेवारीपासून पुनर्बांधणी आणि विकासकामांमुळे दर्शनासाठी बंद ठेवण्यात आले होते. जवळपास पाच महिन्यांच्या कालावधीनंतर आता १५ जूनपासून मंदिर पुन्हा भाविकांसाठी खुले होणार आहे. त्यामुळे राज्यासह देशभरातील शिवभक्तांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मुख्य सभामंडपाची पुनर्बांधणी, परिसर सुशोभीकरण आणि सुरक्षाविषयक कामे अंतिम टप्प्यात पोहोचली आहेत. मंदिर प्रशासनाने उर्वरित कामेही वेगाने पूर्ण करण्यास सुरुवात केली असून नव्या स्वरूपात भाविकांना अधिक सुसज्ज आणि सुरक्षित दर्शन व्यवस्था उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# "युद्धात स्त्री-पुरुष असा भेद नसतो, ते लिंग-तटस्थ असतं!" एनडीएच्या संचलनात लष्करप्रमुखांचे वक्तव्य

## राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (NDA) ऐतिहासिक 150 व्या तुकडीचा पासिंग आऊट परेड सोहळा खडकवासला येथे संपन्न.

**पुणे | प्रतिनिधी**

युद्ध आणि स्पर्धेतील सीमा धूसर होत आहे. ग्रे-झोन युद्धप्रणाली, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि बहुआयामी सुरक्षा आव्हानांमुळे सैनिकांनी केवळ कृतीक्षम नव्हे तर विचारक्षमही असणे आवश्यक आहे. युद्धभूमीवर कोणताही लिंगभेद नसतो. युद्ध नेहमी लिंग-तटस्थ असते. परेड मैदानावर महिला आणि पुरुष कॅडेट्समध्ये कोणताही फरक जाणवत नसल्याचे प्रतिपादन लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी शनिवारी केले.

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए)च्या ऐतिहासिक १५० व्या तुकडीचा दीक्षांत संचलन (पासिंग आऊट परेड) सोहळा शनिवारी (दि. ३०) दिमाखदार, शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.या सोहळ्याला मुख्य निरीक्षक म्हणून द्विवेदी उपस्थित होते. त्यांनी परेडचे निरीक्षण केले.



कॅडेट्सना मार्गदर्शन करताना द्विवेदी म्हणाले, ४२ वर्षांपूर्वी मी याच मैदानावरून दीक्षांत संचलनानंतर बाहेर पडलो. लष्करी सेवेच्या अखेरच्या टप्प्यावर नव्या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्याची संधी मिळणे ही अभिमानाची बाब आहे. यशस्वी नेतृत्वासाठी ॲटिट्यूड (दृष्टिकोन), ॲडॅप्टेबिलिटी (अनुकूलनक्षमता ) आणि ॲबिलिटी (क्षमता) ही तीन सूत्रे देत त्यांनी कॅडेट्सना बदलत्या परिस्थितीत सक्षमपणे नेतृत्व करण्याचा सल्ला दिला. सेवा परमो धर्मः या एनडीएच्या ब्रीदवाक्याचे स्मरण ठेवून देशसेवेच्या प्रवासाला प्रारंभ करणाऱ्या सर्व कॅडेट्सना त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावर्षी भारतासह १२ मित्र राष्ट्रांतील २४ परदेशी कॅडेट्सही एनडीएमधून उत्तीर्ण झाले.

### पदक विजेते

» कॅडेट रोहित काजला याने सर्वोत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. कॅडेट पीयूष रौतेलाला रौप्यपदक, कॅडेट साहिल शर्माला कांस्यपदक मिळाले. संघभावना, नेतृत्व आणि प्रशिक्षणातील उत्कृष्टतेसाठी दिला जाणारा प्रतिष्ठेचा चीफ ऑफ स्टाफ बॅनर यंदा चार्ली स्क्वॉड्रनने मिळवला.